**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/ ४४५९८९/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- १८/१०/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

सध्या एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा २०२३ सुरु असुन सदर एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा २०२३ मधील भारत विरुद्ध बांग्लादेश क्रिकेट सामना दिनांक १९/१०/२०२३ रोजी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीतील गहुंजे स्टेडीयमवर होणार आहे. सदर सामना पाहणेकरीता खाजगी वाहनांनी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### देहुरोड वाहतूक विभाग

६. मामुर्डी अंडरपास(मासुळकर फार्म) कडून कृष्णा चौकाकडे जाण्यास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग:- लोढा कडुन येणारी वाहने मामुर्डी अंडरपासपासुन उजवे बाजुस वळुन बापदेव बुवा पासुन कृष्णा चौकाकडे जातील.

७. मामुर्डी गावाकडुन मामुर्डी अंडरपास (मासुळकर फार्म) बाजुकडे जाण्यास प्रवेश बंदी
पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने मामुर्डी जकातनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

८. साईनगर भागातील उपलब्ध करुन दिलेल्या पार्किंग नंबर २,३,४,५,६,७,८,१०,११,१२,१३ मधील वाहनांना सामना संपल्यानंतर मामुर्डी अंडरपास बाजुकडे जाण्यास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :- १. सदरची वाहने साईनगर रोड ते सेंट्रल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
पर्यायी मार्ग :- २. सदर मार्गावरील वाहने शितळादेवी - मामुर्डी जकातनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

९. गहुंजे पुल ते वाय जंक्शनमार्गे स्टेडीयमकडे जाणाऱ्या कार पासधारक वाहनांना तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने सोडुन इतर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

१०. मुंबईकडुन येणाऱ्या व देहूरोड एक्झिटकडुन एक्सप्रेसवे लगतच्या सर्व्हिसरोडने स्टेडीयमकडे जाणाऱ्या कार पासधारक वाहनांना तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने सोडुन इतर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे दिनांक १९/१०/२०२३ रोजी गहुंजे येथे होणाऱ्या भारत विरुद्ध बांग्लादेश एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट सामन्याचे अनुषंगाने आवश्यकतेनुसार वाहतूक मार्गात बदल करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी/वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी **देहुरोड** वाहतुक विभाग,